# यशवंतराव चव्हाण : केंद्र शासनातील एक संसदपटू

**प्राचार्य डॉ. अरुण आर. गाडे,** श्रीमती एम. एम. मेहता आर्ट्स कॉमर्स कॉलेज, पाचगणी, सातारा.
**प्रा. विशाल लहू कांबळे,** डी. के. एस. सी. कॉलेज, इचलकरंजी, कोल्हापूर.

**प्रस्तावना –**

"भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये सक्रिय सहभागी झालेले तरुण नेतृत्व म्हणजे यशवंतराव चव्हाण होय."[१] त्यांचे नेतृत्व संघर्षमय चळवळीने भरलेले होते. त्यांचा जन्म12 मार्च 1913 मध्ये सातारा जिल्ह्यातील देवराष्ट्रे या गावी झाला. त्यांच्या जीवनातील आणि नंतर देखिल त्यांनी चळवळीपासून प्रेरणा घेतलेली दिसते. 1930 मधील साताऱ्यातील असहकार चळवळीमध्ये सक्रीय सहभाग घेतलेला होता. त्यांची भेट स्वामी रामानंद भारती, धुळाप्पा बाबुराव नवले, आप्पासाहेब सिहासाने, व्ही.एस.पागे आणि गोविंद कृपाराम वाणी यांच्याशी झाली व त्यांचे ते शेवट पर्यंत मित्र बनले. "1932 मध्ये 18 महिन्याचा तुरुंगवास देखील त्यांना भोगावा लागला".[२] अशा प्रकारे चळवळीमधुन क्रियाशील राहण्याचा प्रयत्न त्यांनी केला. 1938 मध्ये त्यांनी बॉम्बे विद्यापीठातून इतिहास व राज्यशास्त्र या विषयातुन बी.ए. ची पदवी घेतली. याकाळामध्ये कॉंग्रेसमधील अनेक कार्यकर्ते व नेहरु, सरदार पटेल, केशवराव जेधे यांसारख्या नेत्यांचा जवळुन संपर्कआला. कारण सामाजिक कार्यामध्ये त्यांनी भाग घेतलेला होता. 1940 मध्ये सातारा जिल्ह्याचे कॉंग्रेस अध्यक्ष म्हणून त्यांची नियुक्ती झाली1941 साली एल.एल.बी. परीक्षा पास झाले. 1942 मध्ये फलटनमधील वेणुताईंशी त्यांचा विवाह झाला. याच कालखंडात म्हणजे 1942 मध्ये मुंबई शेषणच्या ऑल इंडिया कॉंग्रेस कमिटी पदी नियुक्ती झाली."या काळात स्वातंत्र्य चळवळीमध्ये सहभाग घेतल्याबद्दल यशवंतराव चव्हाणांना अटक करण्यात आले. पुढे 1944 मध्ये जेलमधुन सुटका करण्यात आली".[३] अशा प्रकारची राजकीय पार्श्वभूमी यशवंतरावांनी मिळवलेली होती. यशवंतराव चव्हाणांना बॉम्बे लेजीस्लेटीव्ह असेब्लीमध्ये सदस्य म्हणून काम करण्याची संधी मिळाली. पाच वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री म्हणून त्यांनी पदभार सांभाळलेला होता. त्यानंतर 21 नोव्हेंबर, 1962 साली भारताच्या संरक्षणमंत्री पदासाठी पं.नेहरुंना यशवंतरावांना बोलविले व संरक्षणमंत्री म्हणून त्यांचे योगदान महत्वपूर्ण आहे. त्याचबरोबर गृहमंत्री,अर्थमंत्री व परराष्ट्र व्यवहार मंत्री म्हणून भुमिका तितकीच महत्वाची बजावलेली आहे. यशवंतराव चव्हाण एक प्रबळ कॉंग्रेसचे नेते होते. सहकाराचे नेतृत्व, सामाजीक कार्यकर्ता व लेखक या स्वरुपाचा एक ज्येष्ठ सकारात्मक दृष्टीने पाहणारा विचारवंत आणि एक उत्कृष्ठ प्रशासक होते. कि याची प्रचिती त्यांनी भुषविलेल्या विविध पदाच्या वरील कार्यावरुन दिसून येतो. सरंक्षण, गृह, अर्थ, परराष्ट्र व्यवहार, उपपंतप्रधान या सर्व पदामधुन त्यांनी बजावलेली भूमिका यातुन त्यांच्यातील प्रशासकाचे गुण वैशिष्ट्य समोर येताना दिसतात. यशवंतराव चव्हाणांनी संसदेमध्ये जी कांही भाषणे केली त्यांमधुन त्यांच्यातील संसदेत कायदे तज्ञ असणारा वक्ता किंवा संसदपटू साठी लागु होणारे गुणवैशिष्ट्ये समोर आलेली पहावयास मिळतात. "त्यांच्यामध्ये प्रश्न, समस्या काळजीपूवक हाताळण्याची क्षमता, भारतीय लोकशाहीच्या विकासाच्या दृष्टीने पाहणारी वृत्ती यांचा प्रत्यय त्यांच्या या संसदेतील भाषणातुन दिसुन येते".[४] एकंदरीत यशवंतराव चव्हाणांच्या व्यक्तिमहत्वाचे विविध पैलु हे त्यांनी भुषविलेल्या विविध पदावरुन व त्यांच्या भूमिकेमध्ये पहावयास मिळतो व तेच पुढे उत्कृष्ठ संसदपटू म्हणून नावलौकिक होण्यास कारणीभूत ठरलेले आहेत. भारतीय लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने महाराष्ट्राच्या निर्मितीचा व आधुनिक जडण-घडणीचा

जाणता नेता असा हा एक उत्कृष्ठ संसदपटू देखिल होता हे कळण्यास मदत होते. यशवंतराव चव्हाण इयत्ता चौथीच्या वर्गात शिकत असताना त्यांच्या शिक्षकाने विचारलेल्या एका प्रश्नाने उत्तर देताना असे म्हटले की, "मी यशवंतराव चव्हाण होणार"[५]असे सांगून ते गप्प बसलेले असले तरी त्यांच्या ज्ञानाची, दृष्टेपणाची प्रौढी ही किती उच्च होती हे यातुन सिध्द होते. आणि म्हणून स्वत:ची ओळख स्वत:च निर्माण करायची असते, की जे आपले नाव इतरांपेक्षा भिन्न स्वरुपाचे होईल. त्याची तुलना अन्य कोणाशी होऊ शकत नाही. हा एक जणु मुलमंत्रच दिलेला असावा लहाणपनापासुनच जिज्ञासू व चिकीत्सक वृत्तीने पाहणारे नेतत्व हे यशवंतराव चव्हाणच बनले. यांमध्येच संसदपटू होण्याच्या सुरुवातीची बीजे सापडतात. ते त्यांच्या जीवनाच्या जडणघडणीचे सकारात्मक असेच भाग आहेत. त्यामुळे सह्याद्रीच्या कुशीत वाढलेल्या या यशवंतरावांनी भारतीय राजकीय व्यासपिठावर स्वत:ची ओळख स्वत:च निर्माण करुन विविध भूमिका पार पाडलेल्या आहेत. यशवंतराव चव्हाण एक खंदे प्रशासक, राजकारणी, मुत्सद्धी नेते, लोकशाहीवादी, सामाजीक कार्यकर्ते, लेखक व उत्कृष्ठ संसदपटू देखिल होते.

**अभ्यासू राजकारणी :-**

यशंवराव चव्हाण जेंव्हा 1932 मध्ये तुरुंगात होते. तेंव्हा त्यांनी वेगवेगळी पुस्तके वाचण्यास सुरुवात केली. खास करुन त्यांना चळवळीला प्रोत्साहन करणाच्या क्रांतीकारक पुस्तकांची आवड निर्माण झाली. त्यामधुन वाचन करण्याची एक नवी दृष्टी त्यांना मिळाली. जागतिक क्रांती व कम्युनिस्टांच्या बद्दल सुरुवातीला त्यांच्या मनामध्ये याच काळात आकर्षण निर्माण झाले. यांशिवाय कॉम्रेड म्हणवुन घेण्यास ते खुप अभिमान बाळगत होते. इतके आकर्षण त्यांचे वाढलेले होते. मात्र नंतरच्या काळात हे आकर्षण हळुहळु कमी झाले. रशियाच्या क्रांतीमधुन ज्याप्रकारचे तत्वज्ञान निर्माण झालेले आहे. त्याप्रकारचे तत्वज्ञान भारतात निर्माण होणे किंवा कृती करणे शक्य होणार नाही.'असे यशवंतराव चव्हाणांनी याबद्दलमत देखील व्यक्त केले आहे. त्यांमुळे भारतीय संस्कृतीने भरलेल्या लोकशाही समाजवादाचा पुरस्कार त्यांनी केलेला दिसतो.[६] थोडक्यात त्यांच्या मनामध्ये क्रांतीच्या चळवळीचे आकर्षण झाले असले तरी भारतीय समावादाचा आग्रहाने पुरस्कार केलेला दिसुन येतो. असे असले तरी स्वातंत्र्य चळवळीला दिशा देण्यासाठी व मृल्यमापण करण्यासाठी भूमिगत असताना देखील यशवंतराव चव्हाणांना क्रांतीकारक पुस्तके उपयोगी पडत होती. म्हणून राजकारणामधुन नेहमी त्यांची दृष्टी नवी आणि पुरोगामी स्वरुपाची अशीच होती. त्यांमुळे त्यांना अभ्यासू राजकारणी होते असे देखिल म्हणता येईल. याचा उपयोग पुढे संसदेचा खासदार असताना संसदपटु म्हणून विविध पदांचा कार्यभार सांभाळतांना झाला.

**राजकीय घडामोडी :-**

बॉम्बे राज्याच्या लेझीस्लेटीव्ह असेंब्लीमध्ये असताना विविध भूमिका त्यांनी आपल्या राजकीय करियर मध्ये पार पाडल्या. 1946 साली दक्षिण सातारा मतदार संघातुन बॉम्बे लेझीस्लेटीव्ह असेंब्लीमध्ये निवडून गेले. त्याचवेळी त्यांची नियुक्ती मुंबईगृहमंत्रालयाच्या सचिवपदी करण्यात आली. त्यानंतरच्या मोरारजी देसाई सरकारमध्ये त्यांची निवड नागरी पुरवठा, सामाजीक कल्याण आणि वनमंत्री म्हणुन मंत्रीपदी करण्यात आली.1953 मध्ये नागपुर पॅक्टवर प्रादेशीक विकासाच्या दृष्टीने सह्या केल्या. 1957 मध्ये कराड मतदारसंघातुन निवडून आले. विधिमंडळामध्ये तेंव्हा त्यांची नियुक्ती कॉंग्रेसच्या नेतेपदी केली. नंतरच्या काळात पुढे मुंबई राज्याचे मुख्यमंत्री म्हणुन त्यांनी कार्यभार स्वीकारला. साधारणत: 1957 ते 1960 या काळात ऑल इंडिया कॉंग्रेसमध्ये ते क्रियाशील होते.1960

साली महाराष्ट्राची निर्मिती झाल्यानंतर मराठी बोलणाऱ्या आधुनिक महाराष्ट्राचे शिल्पकार म्हणून यशवंतराव चव्हाणांना ओळखले जाते. 1 मे 1960 साली महाराष्ट्राचे पहिले मुख्यमंत्री हे यशवंतराव चव्हाण बनले. त्यांनी महाराष्ट्रातील प्रादेशिक समतोलपणा लक्षात घेऊन कृषी, औद्योगिकीकरण, इत्यादीमध्ये समान विकास झाला पाहीजे. यादृष्टीने आपले ध्येय बनवले.[७] लोकशाहीच्या विकासासाठी अनेक संस्थात्मक मंडळ तयार केले. कृषी, शेती व जमिनीविषयक नव-नवीन कायदे निर्माण केले कि जेणेकरुन लोकशाही विकेंद्रीकरणाच्या दृष्टीने व विकासाच्या दृष्टीने महत्वाचे ठरले.

**केंद्रीय शासनातील भूमिका :-**

1962 ला भारत-चीन युध्द सुरु झाले. भारत-चीन सीमा संघर्षामध्ये कृष्णण मेनन यांनी आपल्या संरक्षण मंत्री पदाचा राजीनामा दिला. त्याचवेळी पं.नेहरुंनी यशवंतरावांना केंद्रात बोलवले. मात्र चीनने युध्दात माघार घेतली. आणि पुढे यशवंतराव चव्हाण हे संरक्षणमंत्री बनले. त्यांनी महत्वाच्या भूमिका बजावल्या. भारत-पाकिस्तान युध्दाच्यावेळी तेच संरक्षणमंत्री होते. 1967 च्या सार्वत्रिक निवडणुकीत त्यांची नाशिक मतदारसंघातुन बिनविरोध निवड झाली. आणि14 नोंव्हेबर 1967 ला त्यांची नियुक्ती भारताच्या गृहमंत्री पदी केली. 1970 साली इंदिरा गांधी सरकारमध्ये त्यांची नियुक्ती अर्थमंत्रीपदी आणि 11 ऑक्टोंबर, 1974 मध्ये परराष्ट्र व्यवहार मंत्री म्हणून करण्यात आले.

जुन 1975 मध्ये इंदिरा गांधीनी राज्यांतर्गत राज्य आणिबाणी जाहीर केली होती. तेंव्हा इंदिराजींच्या नियमांचा तडाखा विरोधी पक्षांना व त्यांच्या नेत्यांना जाणवलेल्या दिसुन लो. तेंव्हा यशवंतरावांना इंदिरा गांधीना पाठींबा दिलेला होता. त्यानंतर लगेचच1977 मध्ये सार्वत्रिक निवडणुकीनंतर इंदींरा गांधीची सत्ता गेली. त्यावेळेस यशवंतराव चव्हाणांनी विरोधी पक्षाचा नेता म्हणून भूमिका पार पाडलेली होती. त्याचबरोबर ते एक संसदीय नेता बनले होते.[८] या स्वरुपाची यशवंतराव चव्हाणांचे केंद्राशासन व बॉम्बे राज्यातील भुमिका ह्या महत्वाच्या आहेत.

**सरंक्षण मंत्री असताना भूमिका :-**

यशवंतराव चव्हाण यांची एक संसदपटू म्हणून देखील भूमिका तितकीच महत्वपूर्ण आहे. आपल्या संरक्षण आणि गृहमंत्री पदाच्या मार्फत संसदेमध्ये परिस्थितीनुसार त्यांची जी कांही भाषणे झाली. त्यातुन संसदेतील एक तज्ञ व्यक्ती किंवा वक्ता दर्शविणारी अशी संसदपटूची गुण वैशिष्ठेसमोर दिसुन येतात. 21 नोव्हेंबर, 1962 रोजी त्यांनी सरंक्षण मंत्रीपदाची सुत्रे आपल्या होती घेतली. त्यावेळेस यशवंतराव चव्हाण त्या तत्कालीन चीन-भारत युध्दाच्या संघर्षमय वातावरणात संरक्षणमंत्री म्हणून नवखेच असे होते. परंतु त्यांनी न डगमगता पुर्णपणे संरक्षणाच्यादृष्टीने केंद्रासाठी व संपूर्ण भारताच्या सुरक्षतेच्या दृष्टीने चांगल्याप्रकारे कार्य केले. त्यांचा प्रशासकीय अनुभव हा दीर्घस्वरुपाचा होता. सरंक्षणमंत्री असताना त्यांनी सतत चार वर्षे सरंक्षण विभागाकरिता वेगवेगळ्या स्वरुपाची मागणी केली. याच काळात 1963-64 च्या दरम्यान संसदेमध्ये संरक्षणाच्या वेगवेगळया विषयांवर जी कांही चर्चा, डिबेट झाले यातुन त्यांची चार भाषणे ही यासंरक्षण मंत्रालयाचे प्रतिनिधीत्व करत असल्याची दिसून येतात. तेंव्हा त्या मंत्रालयाची स्थिती अधिक ज्ञान असलेले, चेतना निर्माण करणारे अशा स्वरुपाची बनवलेली होती. यादृष्टीने त्यांची भाषणेही संसदेमधील एक कायदेतज्ञ व्यक्ति किंवा उत्कृष्ठ संसदपटू दर्शविणारी अशीच आहेत.

एकंदरित यशवंतराव चव्हाण भारताचे संरक्षण मंत्री असताना त्यांना कांही महत्वपूर्ण कार्ये केलेली आहेत. यांमध्ये लष्करांमध्ये मनोधैर्य निर्माण केले, लष्कर आणि सरंक्षण मंत्रालयातील संघर्षाची कारणे शोधून काढली, आणि त्यांमध्ये समंन्वय साधण्याचा प्रयत्न केला व कमकुवतता शोधण्याचा

प्रयत्न केला. लष्करी अधिकाऱ्यांना विश्वासात घेऊन कौशल्य आणि सरंक्षणामध्ये समन्वय साधला. पहिली संरक्षण विषयक पंचवार्षिक योजना तयार करुन भारतीय बनावटीची लढाऊ विमाने, लिंडन, फ्रिगेर, वैंजयंता रणगाड्यांचे उत्पादन सुरु केले. तसेच मिग विमाने तयार करण्याचा कारखाना नाशिकमध्ये सुरु केला. नवीन युध्द साहित्य केंद्राचे नुतनीकरण केले. हवाईदल आणि लष्करी दल यांमध्ये योग्य समन्वय साधला. भारतीय सीमा भागात सैन्यासाठी दळणवळणाच्या सोयी सुविधा निर्माण केल्या. इ. प्रश्नांच्या संदर्भात भारतीय संसदेला नेहमी विश्वासात घेतले होते. अनेक अधिकाऱ्यांच्या बदली केल्या. काश्मीर, गुजरात, राजस्थान, पंजाब यासारंख्या सीमा भागांना भेटी देऊन तेथील अधिकारी व सैन्यांशी चर्चा करुन प्रशासनातील समस्या जाणून घेतल्या. त्यांचे मनोबल वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले आणि संरक्षण विषयक करार केले.[९] अशा प्रकारे संरक्षण मंत्री पदावर असताना यशवंतराव चव्हाणांनी केलेले कार्य उल्लेखनीय आहे. संसदेमध्ये वेगवेगळ्या तज्ञांची मते आणि सल्ला देणारी विधाने यांवर याबाबतीत संसदेमध्ये जी चर्चा किंवा डिबेट होत होते. त्यावेळी यशवंतरावांनी त्यांच्या प्रश्नांची उत्तरे उत्कृष्ट पध्दतीने दिलेली दिसून येतात. उत्कृष्ठ संसदपटू म्हणून त्यांची भाषणे ही महत्वाची असायचे. पुढे लाल बहादुर शास्त्री पंतप्रधान झाले असताना देखील भारत ताश्कंद कराराच्यावेळी संरक्षणमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण होते.

10 जानेवारी, 1966 साली शास्त्रीजींच्या ह्दयविकाराच्या तीव्र झटक्याने मृत्यू झाला. तेंव्हा यशवंतरावांनी त्यांचा देह भारतात घेऊन आले. तेंव्हा त्यांनी मोराजींना पाठींबा न देता पंतप्रधान म्हणून इंदिरा गांधीना पाठिंबा दिला. पुढे इंदिरा गांधी पंतप्रधान बनल्या आणि इंदिरा सरकारमध्ये संरक्षणमंत्री म्हणून यशवंतराव चव्हाण बनले. त्यांमुळे यशवंतराव चव्हाणांनी सरंक्षण मंत्री म्हणून केलेले कार्य देशनिष्ठ, देशातील तळमळ, आणि राष्ट्राभिमान जागृत करणारा आहे. त्याचबरोबर उत्कृष्ठ संसदीय प्रणालीचा तज्ञ असणारा असाच आहे.

**गृहमंत्री असताना भूमिका–**

मा.यशवंतराव चव्हाण यांची 14 नोंव्हेंबर, 1966 साली गृह, कायदा आणि सुव्यवस्था मंत्रीपदी नियुक्ती तात्कालीन पंतप्रधानांनी केली. 29 नोव्हेंबर, 1966 साली लोकसभेमध्ये प्रतिबंधक बंधन विधेयेक (Preventive Detention (Continuance Bill) हे विधेयक निर्माण करण्यासाठी लोकसभेत यांवर डिबेट झाले. त्यानंतर प्रिव्हेन्शीव डिटेंशन ॲक्ट ला नंतर पुन्हा6 डिसेंबर, 1966 रोजी त्यावंर राज्यसभेत चर्चा झालेली होती. तेंव्हा या संदर्भात यशवंतराव चव्हाणांनी जे भाषण केले ते संसदेतील तज्ञ किंवा संसदपटू म्हणून महत्वाचे होते. या ॲक्टच्या दृष्टीकोणातुन त्यांनी बोलत असताना देशातील समस्या कमी करण्याच्या दृष्टीने हा कायदा करणे महत्वाचे आहे. असे प्रतिपादन केले. कायद्याने शिक्षा करण्याच्या दृष्टीने ही तरतुद करण्यासाठी कृती केली पाहिजे. अशा प्रकारची मांडणी त्यांच्या एका भाषणामधुन पुढे आलेली होती.[१०] तर दुसरे भाषण हेएस.एम. बॅनर्जी यांच्या प्रश्नाला उत्तर देत असताना त्यांनी संसदेमध्ये शासनाच्या जबाबदारी बद्दल व काळज़ीपूर्वक वास्तवीकरित्या पाहणाऱ्या दृष्टीकोनाबद्दल एकंदरीत चर्चा केली आहे. अशी या प्रतिबंधक बंधन विधेयकाच्या संदर्भात संसदेमध्ये जी चर्चा झाली ती उत्कृष्ठ भाषणाच्या सहाय्याने वक्तीशीरपणा दर्शविणारी अशीच आहेत.

यशवंतराव चव्हाणांनी पुढे (Subject of Gherao) घेराव या विषयी देखिल 31 मे 1967 रोजी राज्यसभेत जी चर्चा केली ही देखील महत्वाची आहे. इस्टर्न झोनल कौन्सिलची मिटींग 18 व 19 मे 1967 साली केंद्रिय गृहखात्यामार्फत भरलेली होती. यामध्ये 'घेराव' या विषयी पत्रकार परिषद देखील

आयोजीत केलेली होती.[११] आणि त्याच धरतीवर राज्यसभेत देखील ही चर्चा 1967 मध्ये झाली. ती देखील लोकशाही राजकारणाच्या दृष्टीने सकारात्मक विचार करणारी अशीच होती.

तसेच यांशिवाय जेंव्हा नेहरु पंतप्रधान होते. तेंव्हा 1961मध्ये एक राष्ट्रीय एकीकरण परिषद घेतली होती. पुढे यामध्ये राजकीय पक्षांचे विविध प्रतिनिधी त्यांचे महत्वाचे नेतृत्व, त्यांच्या लोकप्रिय विचारांना, शैक्षणिक तज्ञांना यांमध्ये सहभागी करुन घेतले होते. त्यांवेळी कलम 19 मध्ये घटनादुरुस्ती करुन मुलभूत हक्कांच्या अंतर्गत देशाचे सार्वभौमत्व आणि अखंडता विषयी तरतुद करण्याचे ठरविले होते. मात्र पुढे 1967 च्या दरम्यान उत्तर, दक्षिण आणि पूर्व भारतीय भागात कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला. प्रचंड मोठ्याप्रमाणात दबाव निर्माण झाला. तेंव्हा संसदेमधील 14 ऑगस्ट 1967 मध्ये राज्यसभेमध्ये या (Unlawful Activities (Prevention) Bill) या संदर्भात संयुक्त अधिवशेनात भाषण दिले. तर दुसरे भाषण 16 नोव्हेंबर, 1967 मध्ये ते बील पुन्हा चर्चा करण्यासाठी लोकसभेत मांडले होते. तेंव्हा देखील संयुक्त अधिवेशनात भाषण दिले होते. यातुन यशवंतराव चव्हांणानी भुपेश गुप्ता यांच्या प्रश्नांना उत्तरे देत असताना दिलेली आहेत.[१२] यातुन त्यांच्या संसदेमधील एक तज्ञ व्यक्तीमत्वाची, मुत्सदीपणाची जाणीव आपल्याला होऊ लागते.

यशवंतराव चव्हाणांची अशा स्वरुपाची भाषणे ही केंद्रीय शासनाची भूमिका ठरवण्यामध्ये महत्वाची बनलेली होती.[१३] कि ज्यांमुळे राष्ट्राच्या संदर्भात, केंद्र-राज्य संबंधाबाबत भूमिका, राष्ट्रपती राजवटीच्या संदर्भात, कलम 356 च्या संदर्भात इ. तरतुदी विषयक चर्चा झाली ही देखील महत्वाची अशीच होती. मात्र असे असले तरी यशवंतराव चव्हाणांनी 1967 चे वर्ष हे गृहमंत्रीपदाच्या कसोटीचे वर्ष होते असे म्हटले आहे. या गृहमंत्री काळात गोवध बंदीची चळवळ, नक्षलवादाचे असंतोष, जातीय दंगली इत्यादी प्रश्न निर्माण झाले. तेंव्हा कायदा आणि सुव्यवस्था यांचे रक्षण करण्याचा संबंध हा गृहमंत्र्याचा येतो. त्यामुळे कॉंग्रेस पक्षीय नात्याने सामाजीक न्याय व समता या तत्वांवर समाजाचे स्थित्यंतर घटनात्मक मार्गाने केले पाहिजे. यांवर यशवंतराव चव्हाणांची श्रध्दा आहे. तसेच नक्षलवादाच्या संदर्भात देखील त्यांनी असे म्हटले की, आम्हाला विशिष्ट वर्गाचे रक्षण करायचे नव्हते. तर आमच्यास रक्षण करायचे होते ते शांततेचे.' बंगालमधील सरकारने जमीनींचा प्रश्न संसदीय मार्गाने न सोडविता तो दहशतीने सोडिवण्यात प्रोत्साहन दीले. हींसात्मक सामुदायीक अंदोलन करण्याचे प्रयत्न झाले. तेथे तुमचे सरकार असताना स्थीत्यंतर व हींसा कशाला अशी भुमीका त्यावेळेस यशवंतरावांची होती.[१४] व ती देखील कायदा आणि सुव्यवस्था राखणारी होती. त्यांचा दृष्टीकोन हा कायदेशीर घटनात्मक, राष्ट्रीय व संसंदीय लोकशाहीच्या दृष्टीने कायदा आणि सुव्यवस्था निर्माण करणारा होता.

एकंदरीत यशवंतराव चव्हाण हे गृहमंत्री असताना केंद्रराज्य संबंधाबाबत भारतीय राज्यघटनेच्या ११ व्या भागात-जी तरतुद केलेली अहे. त्यासंदर्भात राज्यराज्यातील संघर्ष, अशांतता, कायदा आणि सुव्यवस्था, केंद्राचा हस्तक्षेप इ. चा समावेश होतो. साधारणतः गृहमंत्री असताना यशवंतराव चव्हाणांनी कायदा आणि सुव्यवस्थेच्या संदर्भात अनेक पाऊले उचलली. यामध्ये18 नोव्हेंबर, 1960 चे समाजवादी युवकजन सभेमार्फत राष्ट्रीय पातळीवर विद्यार्थ्यांचे धरणे अंदोलन सुरु होते. तेंव्हा त्यांनी त्यांच्या मागण्याच्या सहानुभूतीपूर्वक विचार केला. गोवध हत्याबंदीला समर्थन देण्यासाठी यमुना नदीच्या काठावर मंदीरात पुरीचे जगद्गुरु शंकराचार्य यांनी उपोषन सुरु केले होते. हे प्रकरण यशवंतरावांनी व्यवस्थीत हाताळले. त्याचबरोबर ऑगस्ट 1963 मधील मुस्लीम तरुण आणि हंदु तरुणी यांच्या प्रेमवीवाहामुळे निर्माण झालेली जातील दंगल यामध्ये शांतता निर्माण केली. नक्षली

कारवायांचा बीमोड केला. अनेक राज्यांतील दंगली उदभवल्या तेंव्हा तेथे कायदा आणि सुव्यवस्था राखली. केंद्र-राज्य सरकारमध्ये मतभेद निर्माण झाल्यास वरोधी पक्षांची अनेक राज्यसरकारे बरखास्त केली.[१५] इ. प्रश्नांच्या संदर्भात यशवंतरावांनी कायदा आणि सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने प्रयत्न केले.

त्यामुळे यशवंतराव चव्हाण गृहमंत्री असताना देखील वेगवेगळ्या पातळीवर कायदा आणि सुव्यवस्था व शांतता राखण्याच्या दृष्टीने देशाची अखंडता राखण्याच्या दृष्टीने महत्वाचे कार्य केले. "यशवंतराव चव्हाण एक ताकदवान मंत्री होते".[१६] या संदर्भामध्ये वेळोवेळी संसंदेमध्ये जी चर्चा झाली. यामधुन त्यांच्या भाषणांची उत्कृष्ठता समोर येते.

**सारांश/समालोचन –**

मा. यशवंतराव चव्हाणांच्या व्यक्तीमत्वाचे विविध पैलू समोर आले तरी त्यांच्यातील एक संसदेचा सदस्य म्हणून असणारी भूमिका ही तितकीच महत्त्वाची अहे. जितकी एक मुख्यमंत्री संरक्षणमंत्री, अथमंत्री, गृहमंत्री, परराष्ट्र व्यवहार मंत्री म्हणून या सर्व पदांचे कायर्भार सांभाळताना त्यांचे संसंदेतील कायदेशीरतज्ञ किंवा वक्ता म्हणून असलेली भाषणे व चर्चा, ह्या त्यांच्या विविध मंत्रीपदाच्या संदर्भात वेळोवेळी निर्माण झालेल्या प्रश्नांच्या अनुषंगाने संसंदीय लोकशाहीच्या दृष्टीने व देशाचे अखंडत्व राखण्याच्या दृष्टीने, शांतता आणि कायदा व सुव्यवस्था राखण्याच्या दृष्टीने उत्कृष्ट अहेत. त्या भूमिकांमधुनच यशवंतराव चव्हाणांचे संसदपटूचे देखिल गुणवैशिष्ठ विकसीत झालेले आपल्याला पहावयास मिळते. म्हणून आधुनीक महाराष्ट्राचे शिल्पकार विविध खात्याचे मंत्रीपदे इ. याबरोबरच संसंदपटू ही देखील त्यांनी उत्कृष्टरीत्या भूषविलेली आहे. याशिवाय जरी स्वतःची अोळख त्यांनी स्वतः निर्माण केलेली असली तरी भारतीय प्रक्रीयेमध्ये यशवंतराव चव्हाणांचे नेतृत्व हे एक प्रबळ पक्षनीष्ठा व नेहरुनिष्ठा यांमुळे काँग्रेस पक्षीय व्यवस्थेच्या परिघामधुन ते अधिकाधिक केंद्राकडे विकसित होत गेलेले पहावयास मिळते. म्हणून त्यांना विविध पदांवर काम करण्याची संधी मिळाली. यामध्ये एक प्रबळ पक्षनिष्ठा काय असते याचा नवा आदर्श त्यांनी येणारया पिढीसमोर ठेवला अहे. याचे श्रेय यशवंतराव चव्हाण यांना द्यावे लागते. विविध पदांच्या भुमिकामधुन ते उत्कृष्ठ संसदपटू देखील होते हे अपल्याला लक्षात घ्यावे लागते.

**संदर्भः-**


1. Pradhan R.D.(ed),**'Y.B. Chavan, Selected speeches in parliament, Deefence and home minister'**, volume–I, Ameya Prakashan –1995,**pagepage No.I**
2. http://en.wikipedia.org/wiki/yashwantrao_chavan.
3. Kunhi Krishnan T.V. **'Chavan and the Troubled Decade'**, Somaiya Publications pvt. Ltd. Bomby -1971,**Page No.1**
4. Pradhan R.D.(ed), **'Y.B. Chavan', Selected speeches in parliament, Deefence and home minister'**,volume–I, Ameya Prakashan – 1995,**pagepage No.56**
5. काळे बाबुराव **"यशवंतराव चव्हाण",**गो.य. राणे, प्रकाशन,पुणे-1965,**पृष्ठ क्र.१६**
6. कित्ता **पृष्ठ क्र.२६**
7. http://en.wikipedia.org/wiki/yashwantrao_chavan.
8. http://en.wikipedia.org/wiki/yashwantrao_chavan.
9. कायदे-पाटील गं.वि**. "यशवंतराव चव्हाण"**, चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक-2000,**पृष्ठ क्र.७१-७२.**

**10.** Pradhan R.D.(ed), **'Y.B. Chavan, Selected speeches in parliament, Deefence and home minister'**, volume–I, Ameya Prakashan – 1995,**pagepage No.137**

**11. Ibid-Page No.150**

**12. Ibid –Page No.203**

**13.** Pradhan R.D.(ed), **'Y.B. Chavan, Selected speeches in parliament, Deefence and home minister'**, volume–II, Ameya Prakashan – 1995.**Page No.I**

**14**. चव्हाण यशवंतराव, **"भूमिका",** प्रेस्टिज पब्लिकेशन्स, पुणे-1979,**पृष् क्र.५५-५६.**

**15**. कायदे-पाटील गं.वि**. "यशवंतराव चव्हाण",** चैतन्य पब्लिकेशन्स, नाशिक- 2000,**पृष्ठ क्र.७७-७८**.

**16.** Krishna A.V, **'India Since Independence : Making sence of Indian politics,'** Dorling kindersly (India) Pvt.Ltd, Licensses of pearson education in south Asia – 2011,**Page No.93**